माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- ३९१८ दिनांक :- ८/१२/१८

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०५/१२/२०१८

१. अपिलकर्ता श्री संपत राहुल डोळस,
राहणार :- गुरूदत्त अपार्टमेंट 'ए'विंग, रुम नं.२, हाजिमंलग रोड,
पिसवली, कल्याण(पूर्व).

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री संपत राहुल डोळस
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक , कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री संपत राहुल डोळस यांनी दिनांक २४/०९/२०१८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक ,कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांचेकडे शेषाबाई महादेव बनसोडे यांची रूजू दिनांक व निवृत्ती दिनांक तसेच वयाचे पुरावे मिळणकामी अर्ज केला होता.

जनमाहिती अधिकार तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांस जा.क्र.२९८९ दि.२३/१०/२०१८ अन्वये उत्तर पाठविले असले बाबत सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २४/०९/२०१८ | २३/१०/२०१८ | २३/१०/२०१८ | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २२/११/२०१८ | ०५/११/२०१८ | होय | – | २६/११/२०१८ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ०५/१२/२०१८ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | शेषाबाई महादेव बनसोडे यांची रूजू दिनांक व निवृत्ती दिनांक तसेच वयाचे पुरावे मिळणकामी अर्ज केला होता. | उपरोक्तबाबत अपिलकर्ता यांस जा.क्र.२९८९ दि.२३/१०/२०१८ अन्वये उत्तर पाठविले असले बाबत सांगितले. |

## विवेचन

अपिलकर्ता श्री संपत राहुल डोळस, यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक २४/०९/२०१८ रोजी अर्ज कार्यालयाकडे दाखल झाला. अपिलार्थी यांना त्यांच्या अर्जाचे उत्तर जा.क्र.२९८९ दि. २३/१०/२०१८ रोजी देण्यात आले होते. तरी संबधित जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती दिली नसलेबाबत अपिलार्थी यांनी सांगितले.

श्रीमती शेषाबाई बनसोडे यांचा कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालर्यालयाकडील अर्ज आ.क्र.३७४१ दि.१५/१०/२०१८ अन्वये अर्जदारास जा.क्र.२९८९ दि.२३/१०/२०१८ ने उत्तर पाठविलेबाबत जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांनी सांगितले.

## -: आदेश :-

अर्जदाराने अर्जात विचारलेली माहिती ही वैयक्तिक स्वरूपाची माहिती नसलेकारणाने कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अपीलार्थीस ८ दिवसांचे मुदतीत विनामुल्य देणेत यावी.

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(रविंद्र घोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः ०५/१२/२०१८,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री संपत राहुल डोळस,
राहणार :- गुरूदत्त अपार्टमेंट 'ए'विंग, रुम नं.२, हाजिमंलग रोड,
पिसवली, कल्याण(पूर्व).

२. श्री अशोक महाजन,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक , कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी.......